**नि.दिवाणी दावा क्रं.५२/२०१३**

**नि. क्रं.६० लगत.**

**:: प्रतिवादी क्र.७ व ८ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. बी.सी. अपसिंगेकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू ::**

१२. माझी शेती कमलनगर येथे आहे. माझी शेती लासोना किंवा ईतर ठिकाणी नाही. माझ्या साडुची मुलगी वादीला पत्नी म्हणून दिलेली आहे. त्यांचे लग्न वर्ष २००५ मध्ये झाले. तत्पूर्वी माझा वादीसोबत संबंध नव्हता. वादीचे कुटुंब वर्ष २००६–०७ मध्ये पुणे येथे राहण्यास गेले. वादी हा हैद्राबाद येथे राहण्यास वर्ष २००९–१० मध्ये गेला होता. वादी हे पुणे येथून लग्न समारंभ व सण उत्सव याकरिता गावी येत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी वादी शेताकडे चक्कर मारायचे. राजेंद्रने विकलेल्या जमिनीचा क्रमांक मला सांगता येत नाही. प्रतिवादी क्र.९ कावेरीला विकलेल्या जमिनीचा क्रमांक मला सांगता येत नाही. मला जमिनीचे क्षेत्र व चतु:सिमा सांगता येत नाहीत. मी खरेदीखताचा साक्षीदार नाही. मी पंच म्हणून सुध्दा नव्हतो. माझा वाद जमिनीमध्ये हिस्सा नाही.

१३. आता मला साक्ष प्रतिज्ञालेखातील परिच्छेद क्र.८ व ११ हा वाचून दाखविला. मी तो सांगितलेला व लिहिलेला नाही. मला नमूद बैनामे आणि त्यातील व्यवहार याबाबत माहिती नाही. खरेदीखताचा मोबदला दिला किंवा कसे हे मला माहीत नाही. खरेदीखत विनामोबदला झाल्याचे मी सांगितलेले नाही.

१४. दाव्यातील प्रतिवादीशी माझी ओळख नाही. दावा जमिनीमध्ये कोणाचा काय हिस्सा आहे हे मला माहीत नाही. वादी लग्नानंतर त्याच्या सासरी येत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी वादी गावाकडे येत–जात होता. राजेंद्र हा वादीच्या कुटुंबाचा मुख्य माणूस होता. त्यामुळे तो कुटुंबाचा

सर्व व्यवहार पाहत होता. तो घरातील लागणाऱ्या वस्तू आणून देत होता. तो कुटुंबामध्ये व्यवहार करीत होता. हे मला माहीत नाही की, राजेंद्र हा व्यवहाराचे पैसे कुटुंबाकरिता वापरायचा. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये बेकायदेशीर बैनामे असल्याबाबत खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, वादी आणि प्रतिवादी हे एकत्र कुटुंबातील घटक असल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा कथन केला. मी पाहुणपणाने वादीच्या घरी लासोना येथे जात होतो. मी वादीच्या घरी पंचवीस ते तीस वेळा गेलो असेल. मी महिन्यातून एक–दोनदा वादीच्या घरी जात होतो. त्यावेळी माझी वादीसोबत भेट होत होती. त्यादरम्यान वादीकडून मला नमूद बैनाम्याबाबत समजले. त्यावेळी वादीचा भाऊ संदीपचे लग्न होते. परंतु त्याचे वर्ष मला आठवत नाही. सदर लग्न होऊन दहा वर्ष झाले असेल. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

**:: <u>प्रतिवादी क्र.१ ते ६ व ९ हे आणि त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. त्यांनी उलटतपास घेण्यास कसूर केलेला आहे. सबब उलटतपास नाही. ::</u>**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत | सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि. ०९/१२/२०२५.